<u>**प्रेस नोट**</u>

जळगांव
दिनांक २९/१२/२०१६

स्पोर्टस ॲथोरीटी ऑफ इंडीया व नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो यांचे कडुन आयोजित व सेंट्रल डिटेक्टीव्ह ट्रेनिंग स्कुल, हैदराबाद यांच्या मार्गदर्शना खाली दिनांक १९/१२/२०१६ ते २३/१२/२०१६ या कालावधीत ६० व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा -२०१६ स्पर्धांमध्ये भारतातुन विविध राज्यातुन पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पोलीस कर्तव्य मेळाव्यात सहभागी झाले असतांना अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात घेण्यात आलेल्या परिक्षांमध्ये जळगांव जिल्हा पोलीस दलात बॉम्ब शोधक व नाशक पथक, जळगांव मधील <u>**पोकॉ/२९६४ जुबेर इकबाल शेख**</u> यांनी <u>**Scintific Aid to Investigation**</u> या विषयात उत्कृष्ट रित्या कामगीरी करुन तृतीय क्रमांक पटकाविलेला आहे. त्यांच्या या कामगीरी बद्दल त्यांना श्री. भास्कर राव, भापोसे, अपर पोलीस महासंचालक, कर्नाटक राज्य यांचे हस्ते <u>**कांस्य पदक व पुरस्कार**</u> देऊन सन्मानीत करण्यात आले आहे. <u>**पोकॉ/जुबेर शेख यांना जळगांव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक, श्री. जालिंदर सुपेकर व बॉम्ब शोधक व नाशक पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री. ईश्वर सोनवणे यांचा मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.**</u>

पोकॉ/ जुबेर शेख यांनी हे २००८ मध्ये जळगांव पोलीस दलात भरती झाले आहेत. त्यांनी पोलीस दलातील कमी कालावधीत महाराष्ट्र राज्य तसेच जळगांव पोलीस दलाची मान उंचावुन <u>**६० व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०१६ मध्ये कांस्य पदक प्राप्त केल्या बद्दल पोलीस अधीक्षक श्री. जालिंदर सुपेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले असुन रोख रुपये २०००/- बक्षिस मंजुर केले आहे.**</u>